

सारांश :-

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्वपूर्ण व आधुनिक शाखा आहे. त्यामूळे वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा अभ्यास हा महत्वाचा वाटतो. ग्रामीण वसाहतीच्या वितरणावर प्राकृतिक व आर्थिक घटकांचा प्रामुख्याने प्रभाव पडतो. प्रस्तुत अभ्यासासाठी वसमत तालुक्यातील सर्कलनिहाय ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास केला असून त्यामध्ये एकूण लोकसंख्या, क्षेत्रफळ, दोन वस्तीमधील अंतर इ. घटकाचा आढावा घेतलेला आहे. तसेच वसाहतीची दर 100 चौ.कि.मी. ला घनता वाढत गेल्यास वसाहतीचे सरासरी क्षेत्र कमी होते. त्याचबरोबर वसमत तालुक्यातील सर्कलनिहाल ग्रामीण वसाहतीची संख्या त्यामध्ये टेभूर्णी (35),गिरगांव (31),वसमत(33), हट्टा(27)व एकून153ऐवढ्या आहेत.

बिजसंज्ञा : वसाहतीची घनता, लोकसंख्या, ग्रामीण वस्ती आणि वस्तीमधील अंतर .

बी. एन. पस्तापूरे[1] , बालाजी आव्हाड[2]

[1]सहाय्यक प्राध्यापक, इंदीरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड.
[2]संशोधक विद्यार्थी : भूगोल विभाग, महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.

वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास

बालाजी आव्हाड
संशोधक विद्यार्थी : भूगोल विभाग, महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.

प्रस्तावना :-

वसाहतभूगोल ही मानवी भूगोलाची शाखा असून प्राचीन काळापासून आजपर्यत मानव समुहाने राहत आलेला आहे. या त्याच्या समुहभावनेतून वसाहतीचा उगम झालेला आहे (पाटील आणि चिताम, 2012). शेती व्यवसायाला प्रारंभ झाल्यापासून मानवी जिवनाला स्थिर स्वरुप प्रारुप प्राप्त झाले आहे (चंदेल, 2009).सर्वप्रथम नद्यांच्या खोऱ्यात सुपीक मृदेच्या क्षेत्राजवळ वस्त्यांचा उगम झाला आहे असे अनेक तंज्ञानी म्हटले आहे (मंडल, 1979, खराटे, 2009, कनकुरे व इतर, 2011, नाइकवाडे व इतर, 2011).सुरुवातीला शेती, मासेमारी, वनसंकलन, लाकुडतोड या प्राथमिक व्यवसायामुळे वरील सर्व वस्त्यांचे स्वरुप ग्रामीण प्रकारचे होते (लंवाडे आणि चौधरी, 2003). तसेच काळाच्या ओघात काही ग्रामीण वसाहतीचा वेगाने विकास घडून येऊन त्यांची कार्यही बदलत गेली. पण त्यांच्या विकासाचा वेग व पातळी सर्व ठिकाणी सारखी नसते. त्यामुळे त्यांचा आकार देखील सारखा नसतो. दोन वस्तीमधील अंतर वाढले की वस्त्यांची घनता कमी होऊन आकार वाढतो. व त्यामुळे वस्तींची घनता व लोकसंख्या सुध्दा बदलते (वेळापूरकर, 2009).प्रस्तुत शोधनिंबधात वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा आकार व घनता यांचा अभ्यास केला आहे.

उद्दीष्ट्ये :

प्रस्तुतशोधनिंबधात वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा आकार व अंतराचा अभ्यास केला असून खालील उद्दीष्ट्ये समोर येतात.
वसमत तालुक्यातील लोकसंख्येनुसार वस्त्यांचे वितरण अभ्यासणे.
सरासरी लोकसंख्या व घनतेचे वितरणअभ्यासणे.
वसाहतीची घनता अंतरानुसार अभ्यासणे.

अभ्यासक्षेत्र :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी हिंगोली जिल्हयातील वसमत तालुका निवडला आहे. या अभ्यास क्षेत्राचा अक्षवृत्तीय विस्तार19°5′ते 19°37′उत्तर व रेखावृत्तीय विस्तार77°55′ ते 77°17′ पूर्व या दरम्यान असून तालुक्याचे एकुन क्षेत्रफळ 887.40 चौ.कि.मी. आहे. वसमत तालुक्यात एकुणपाच सर्कल (मंडळ) आहेत त्यामध्ये वसमत, टेभूर्णी, हट्टा, गिरगांव व कुंरुंदा यांचा समावेश होतो. तसेच एकून 153 ग्रामीण वसाहती असून वसमत हे नागरी वस्ती आहे. अभ्यास क्षेत्राचे सरासरी तापमान 33.40°ब्असून सरासरी पर्जन्य 900 ते 1200 मी.मी. च्या दरम्यान आढळते.

माहिती संकलन व संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये हिंगोली जिल्हा जनगणना अहवाल 2001 नुसार दुय्यम स्वरुपाची माहिती वापरली आहे. त्याचबरोबर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (2001)तसेच अनेक शोध निबंधातील संदर्भ व पध्दतीचा वापर प्रस्तुत शोधनिबंधासाठी केला आहे. संशोधन पध्दतीमध्ये वसाहतीचे अंतर लक्षात घेउन त्यांचे विश्लेषन केलेले आहे. सरासरी अंतर काढण्यासाठी पॉलीष व वलेंटी विनिड यांच्या सुत्राचा वापर केलेला आहे.त्याचबरोबरArc GISया सॉफ्टवेअरच्या सहाय्याने वसाहतीच्या वितरणाचा नकाशा तयार केला आहे.

सुत्र : $D= \sqrt{A/N}$

D= वसाहतीतधील सरासरी अंतर
A = तालुक्याचे एकुण क्षेत्रफळ
N =वसाहतीचीएकुण संख्या

आकृती क. 1: वसमत तालुक्यातील सर्कल निहाय ग्रामीण वसाहतीचे वितरण



स्त्रोत : हिंगोली जनगणना अहवाल 2011 नुसार

ग्रामीण वसाहतीचे क्षेत्र व घनता:

अभ्यासक्षेत्रातील वेगवेगळ्या सर्कलमधील वसाहतीचे सरासरी क्षेत्र व घनता दर 100 चौ.कि.मी. ला किती आहे याचा सर्वप्रथम अभ्यास केलेला आहे. अभ्यास क्षेत्राच्या पूर्वेकडील कुंरुंदा आणि पश्चिमेकडील हट्टा सर्कलमध्ये वस्त्यांची घनता सर्वात कमी असून ती 17.65 (दर 100 चौ.कि.मी.) एवढी आहे. त्यामुळे या सर्कलमध्ये दर वसाहतीचे सरासरी क्षेत्र हे सर्वाधिक म्हणजे 21.87:व त्याखालोखाल 18.81%(दर वस्तीचे सरासरी क्षेत्र) आहे.

तक्ता क. 1: वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीची घनता व क्षेत्र

अ. क.	तालुका सर्कल	वसाहतीची संख्या	वसाहतीचे क्षेत्र चौ.कि.मी.	वसाहतीचे क्षेत्र %	दर 100 चौ.कि.मी. ला वसाहतीची घनता
1	कुंरुंदा	27	194.06	21.87	17.65
2	गिरगांव	31	189.59	21.36	20.26
3	वसमत	33	156.71	17.66	21.57
4	टेभूर्णी	35	180.13	20.30	22.88
5	हट्टा	27	166.91	18.81	17.65
6	एकुन	153	887.40	100.00	20.00

स्त्रोत : अध्ययन क्षेत्रातुन प्राप्त आकडेवारी नुसार

आकृती क. 2: वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीची घनता व क्षेत्र



स्त्रोत : अध्ययन क्षेत्रातुन प्राप्त आकडेवारी नुसार

या सर्कलमध्ये भौगोलिक परिस्थिती अनुकूल असल्यामूळे त्या ठिकाणी वस्त्यांचा विकास झालेला आहे. त्यामुळेच वसाहतीची घनता कमी तर सरासरी क्षेत्र अधिक आढळते. तसेच टेभूर्णी सर्कलमध्ये वसाहतीची सरासरी घनता सर्वाधिक 22.88 (दर 100 चौ.कि.मी.) एवढी आहे. तर याच सर्कलमधील वसाहतीचे सरासरी क्षेत्र मध्यम म्हणजेच 20. 30%(दर वसाहतीचे सरासरी क्षेत्र) ऐवढे आहे. उर्वरीत सर्कलचा अभ्यास केला असता वसाहतीची घनता टेभूर्णी सर्कलनंतर वसमत (21.57), गिरगांव (20.26), कुंरुंदा आणि हट्टा (17.65) अशी कमी होत गेल्याचे आढळून येते.तर दर वसाहतीचे सरासरी क्षेत्र हे वसमत (17.66), हट्टा (18.81), टेभूर्णी (20.30), गिरगांव (21.36), कुंरुंदा (21.87) अषी वाढत गेल्याचे दिसून येते यावरुन दर 100 चौ.कि.मी. वस्त्यांची घनता व सरासरी क्षेत्र यांचा परस्पर संबंध असल्याचे लक्षात येते. वस्त्यांची घनता वाढल्यास वस्त्यांचे सरासरी क्षेत्र हे कमी होत जाते. तर वस्त्यांची घनता कमी झाल्यास सरासरी क्षेत्र हे वाढत जाते (तक्ता.1 आणि आकृती 2).

ग्रामीण वसाहतीमधील अंतर :

वसाहतीमधील सरासरी अंतर अभ्यासले असता वसमत सर्कलमध्ये दोन वस्त्यांमधील सरासरी अंतर हे 2.18 कि.मी. ऐवढे असून ते सर्वात कमी आहे. तर कुंरुंदा सर्कलमधील सरासरी अंतर हे 2.68 कि.मी. ऐवढे असून ते सर्वाधिक आहे (तक्ता 2 व आकृती 3). ज्या ठिकाणी

तक्ता क. 2: वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीच्या लोकसंख्येनुसार अंतर व क्षेत्र

अ.क.	तालुका सर्कल	वसाहतीचे सरासरी अंतर कि.मी.	दर वसाहतीची सरासरी लोकसंख्या	वसाहतीची सरासरी लोकसंख्या
1	कुंरुंदा	2.68	43920	21.99
2	गिरगांव	2.47	44607	22.33
3	वसमत	2.18	28080	14.06
4	टेभूर्णी	2.27	43423	21.74
5	हट्टा	2.49	39694	19.87
6	एकुन	2.41	199724	100.00

स्त्रोत : अध्ययन क्षेत्रातुन प्राप्त आकडेवारी नुसार

सरासरी अंतर कमी होते तेथे वसाहतीचे केंद्रीकरण होते व घनता वाढते. तसेच ज्या ठिकाणी सरासरी अंतर वाढते तेथे वसाहतीचे विकेंद्रीकरण होऊन घनता कमी होते. यावरुन वसमत सर्कलमध्ये वसाहतीचे घनता अधिक झालेली आहे. तर कुंरुंदा सर्कलमधील वसाहतीचे केंद्रीकरण होऊन घनता कमी झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे वसाहतीचे केंद्रीकरण अधिक असेल तर सरासरी अंतर कमी असते व केंद्रीकरण कमी असेल तर सरासरी अंतर अधिक असते.वसमत सर्कलमध्ये वस्त्यामधील सरासरी अंतर वाढल्याने वस्त्यांचे केंद्रीकरण व घनता ही कमी होत गेलेली आहे. वसाहतीमधील सरासरी अंतर टेंभूर्णी 2.27, गिरगांव 2.47, हट्टा 2.49, ऐवढे असल्याचे दिसून येते. तसेच वरील सर्कलमध्ये वसाहतीचे केंद्रीकरण व घनता ही कमी कमी होत गेली आहे (तक्ता 2).

निष्कर्ष :

अशा प्रकारे वरील प्रमाणे वसमत तालुक्यातील ग्रामीण वसाहतीच्या अभ्यासावरुन असे लक्षात येते की, ज्या सर्कलमध्ये शेतीसाठी अनुकूल जमीन जास्त आहे. त्या सर्कलमधील वसाहतीचे केंद्रीकरण व घनता अधिक आहे. तर शेती योग्य जमीनीचे क्षेत्र जस–जसे कमी होत गेले तस–तसे केंद्रीकरण व घनता ही कमी होत गेली आहे. यावरुन टेभूर्णी सर्कलमध्ये शेतीसाठी सुपीक जमीन जलसिंचन सुविधामुळे वसाहतीची घनता सर्वाधिकअसून ती 22.88%तर कुरुंदा व हट्टासर्कलमध्ये उंचसखलपणा आणि जलसिंचनाची कमतरता असल्याने वसाहतीची घनता सर्वात कमी असून ती 17.65%आहे. तसेच ज्या वसाहतीचे केंद्रीकरण वाढत गेले त्या वसाहतीची सरासरी लोकसंख्या ही कमी होऊनवसाहतीचेकेंद्रीकरणही कमी होत जाते. तर सरासरी लोकसंख्या वाढत जाते. त्यामुळे अनेकदा वसाहतीचा आकार ही वाढत गेल्याचे दिसून येते. तसेच वसाहतीची घनता कमी होते हे स्पष्ट होते. वसाहतीची दर 100 चौ.कि.मी. ला असलेली घनता वाढत गेल्यास सरासरी क्षेत्र ही कमी होते. यावरुन ज्या प्रदेशात शेती सारख्या स्थिर व्यवसायाचा प्रभाव असल्याचे दिसून येते, त्यामुळे त्या प्रदेशात वसाहतीचा आकार लहान व घनता अधिक असल्याचे दिसते.

संदर्भ :

1.Census of India, district Census Handbook, Hingoli district, 2011.
2.Chandel, A. S. (2009): A Geographical study of rural settlement types and factors affecting the rural settlements in Bilaspur district (H.P.), International indexed and refereed research Journal, March, Vol. IV, Issue 42, PP. 1-3.
3.Kankure, K.B., Mankari, M.P. and Pastapure, B.N. (2011): Types of Rural Settlements in

Nanded District (MS),International referred research Journal, Feb., 2011, Vol. II, Issue 25, PP. 1-3.
4.Kharate V. B. (2009): "Spatial distribution pattern of rural settlement in the Painganga Valley, Vidarbha Region, Shodh, Samiksha aur Mulyankan, Vol. II, Issue 7 (Aug. 2009), PP. 20-22.
5.Madal, R.B (1979): "Introduction to Rural Settlement", Concept publication, New Delhi.
6.Patil, S.B. and Chittam, R. S. (2012): "Distribution and Growth of Rural Settlements: A case Study of Dhule district (M.S.)", Golden Research Thoughts, Vol. 2, Issue 5, Nov. 2012, PP. 1-4.
7.लंवाडे, एस.एम. व चौधरी, एस.आर. (2003): पूर्णा नदी खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती, म.भू.प. पुणे, खंण्ड. XVII, अंक. 1, (जाने.–जुलै 2003),PP. 1-10.
8.वेळापूरकर, बी.जी., राठीड, एच.बी., काळगापूरे, ए. आणि गोणे, सदानंद(2009):परभणीजिल्हयातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास, शोध, समिक्षा और मुल्याकन,Vol. II, Issue 7, Aug. 2009, PP.416-417.
9.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2011.